रे.क.नं. १९०/२०१४ मधील निशाणी क्र. ५१ वरील आदेश

**(CNR NO.MHKO09-000299-2014)**

वादीने सदरचा अर्ज खरेदीदस्ताचे साक्षांकित नक्कल हस्ताक्षर तज्ञाकडे पाठविण्यासाठीचा आहे. त्यांचे म्हणणे असे आहे की, प्रतिवादी क्र. १ व २ यांनी वादी यांचे वडील गौस यांचेकडून खरेदीपत्र म्हणविणारे बनावट दस्त क्र. २६६५ दि.१८.८.२००६ रोजी आणि दस्त क्र.२३४५ दि.२१.८.२०१० रोजी तसेच दस्त क्र. ३९३ दि. ८.२.२०१० रोजी खोटया व बनावट सहया करुन करुन घेतलेले आहेत. सदरचे मुळ दस्त प्रतिवादी क्र. १ व २ यांनी याकामी हजर करावेत असा अर्जदेखील वादी यांनी दिला होता परंतु ते हरविले आहेत असे खोटे कथन करुन कागद हजर करण्यास टाळाटाळ केलेली आहे. वादी यांनी गौस यांचे सहया असलेले कागदपत्र ग्रामपंचायत बसर्गे यांना हजर करणेस विनंती केली होती ते कागद याकामी हजर आहेत व ते निशाणी क्र.३४, ४९ व ५० सोबत आहेत. सदर कागदपांवरील गौस यांच्या मुळ सहया आणि बनावट खरेदी पत्रांवरील सहया याची पडताळणी करण्यासाठी हस्ताक्षर तज्ञाकडे कागदपत्रे पाठविण्यात यावेत अशी विनंती केली आहे.

२. सदर अर्जाला प्रतिवादी क्र. १ ते ६ यांनी निशाणी क्र. ५२ प्रमाणे म्हणणे दिले आहे. त्यांचे म्हणणे असे आहे की, वादी यांना स्वाक्षरीबद्दल वाद उत्पन्न करुन हस्ताक्षर तज्ञाकडे कागदपत्रे पडताळणीकरीता पाठविण्याचा मुस्लीम कायद्यानुसार अधिकार नाही. गौस यांच्या हयातीत वादी यांनी सदर कागदपत्रांबद्दल कधीही वाद उपस्थित केला नाही. वादी यांना सि.स.नं.७८५ मध्ये कोणताही हक्क मागणेचा अधिकार राहिलेला नाही. तसेच इतर खरेदीदस्त देखील मोबदला देवून झालेले असल्यामुळे आता गौस यांचे मृत्यूनंतर त्याबद्दल वाद उत्पन्न करणेचा अधिकार नाही. मुळ दस्त हरविले असून ते उपलब्ध नाहीत. तसेच स्वाक्षरी केलेल्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर स्वाक्षरी तपासणी

बाबतची मागणी करण्याचा अधिकार वादी यांना नाही. सबब अर्ज खर्चासह नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

३. वादी यांनी दिनांक १८.८.२००६ व दिनांक २१.८.२०१० आणि दिनांक ८.२.२०१० हे गौस यांच्या खोटया व बनावट सहया करुन अस्तित्वात आणले आहे असे दाव्यात कथन केले आहे असे त्यांचे म्हणणे आहे आणि सदर दस्त प्रतिवादी यांनी नोटीस देवूनदेखील हजर केले नाहीत असे कथन केलेले आहे. वादी यांचे पुढे असे म्हणणे आहे की, गौस यांच्या मुळ सहया असलेले ग्रामपंचायतीमधील कागद निशाणी क्र. ३४ सोबत हजर केला आहे तसेच निशाणी क्र. ४९ व ५० सोबत काही कागद हजर केले आहेत. त्या कागदांची पडताळणी आणि दस्तांच्या सही शिक्क्याच्या प्रति यावरील सहया हस्ताक्षर तज्ञाकडून पडताळणीकरुन हस्ताक्षर तज्ञांचा अहवाल मागविण्यात यावा अशी विनंती केली आहे. वस्तुतः ज्या दस्तांवरील सहया वादी यांनी नाकारल्या आहेत ते मुळ दस्त कोर्टासमोर नाहीत. निशाणी क्र. ४९ व ५० सोबत जोडलेले कागददेखील हे मुळ कागद नाहीत. निशाणी क्र. ३४ सोबत जोडलेली डायरी यामध्ये जरी मुळ हस्ताक्षर असले तरी सदर हस्ताक्षर पडताळणी ज्या दस्तांसोबत करायची आहे ते मुळ दस्त समोर नसल्यामुळे अशी पडताळणी करता येणार नाही. या दाव्याचे काम चालू असताना जर प्रतिवादी यांनी सदर मुळ दस्त हजर केले तर त्या परिस्थितीत वादी यांना ते मुळ दस्त पडताळणीसाठी पाठविण्याची मुभा ठेवणे योग्य ठरेल. परंतु आजरोजी मुळ दस्त समोर नसताना पडताळणीसाठी पाठविणे योग्य होणार नाही या अनुमानास मी येते. अंतिमरित्या मी या अनुमानास येते की अर्ज चालण्यास पात्र नाही. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करते.

## **आदेश**

अर्ज नामंजुर करणेत आला.

सही/—

दिनांक ०७/०६/२०१९.

(यामिनी बोरावके)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर
**गडहिंग्लज.**

I affirm that the contents of this P. D.F file judgment/Order are same, word to word, as per the original judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | K. B. Chavan |
| Name of the Court | Civil Court, Senior Division. Gadhinglaj |
| Date of Dictation | 07-06-2019 |
| Judgment signed by the P.O on | 10-06-2019 |
| Judgment uploaded on | 11-06-2019 |